। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १०७ वा । गुरूवार दिनांक ०२ जुलै २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मो.अली अमिन रा.कुंभेजा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.३०.०६.२०२६ रोजी कुंभेजा येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे चाकुन हा विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेले परंडा पोलीसांना मिळून आले. यावर पथकाने नमुद लोखंडी तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-श्रीकांत भांगे, पोलीस नाईक नेमणुक पोलीस ठाणे परंडा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह कलम ३५२ भान्यासं अन्वये परंडा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### मुलासोबत बालविवाह लावून तरुणानी केला लैंगीक अत्याचार

मुरुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील १७ वर्षीय ७ महिन्येची मुलगी दि.२४.०५.२०२५ रोजी ते दि.२६.०६.२०२६ रोजी पावेतो हि अल्पवयीन आहे हे माहित असताना तिचे आई वडील ,व सासु सासरे यांनी आपल्या मुलासोबत बालविवाह लावून दिल्याने नमुद तरुणानी तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.३०.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा. न्या. सं. कलम-६४(२), ६४ (२)(एम),३(५), सह कलम ६ पोक्सो सह कलम ९, १०, ११ बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### लग्नाचे आमिष दाखवुन केला लैंगीक अत्याचार

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गतएका गावातील २४ वर्षीय मुलगी मे २०२६ ते दि.२३.०६.२०२६ रोजी ०५.०० वा. सु. हिस एका गावातील एका तरुणानी लग्नाचे आमिष दाखवुन तिस शेतामध्ये घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.३०.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा. न्या. सं. कलम-६९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कोयत्याचा धाक दाखवुन लुटले

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.३०.०६.२०२६ रोजी टॉल्फ सोलार कंपनीची मध्ये वडजी शिवर गट नं ५८६ येथे फिर्यादी दिपक शहाजी जाधवर, वय २७ वर्षे, रा. वडजी ता. वाशी जि. धाराशिव व सोबत विजय सतीश जाधव असे दोघे सेक्युरिटी गार्ड म्हणून कामावर असताना अनोळखी तीन इसमांनी सेक्युरिटी गार्ड यांना काठीने मारहाण करुन कोयत्याचा धाक दाखवुन कंपनीमधील एल जी कंपनीचा एसी, युटीएल कंपनीचा इन्व्हर्टर,चार बॅट्या असा एकुण ७०,००० किंमतीचा माल च जबरदस्तीने चोरुन पसार झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-दिपक जाधवर यांनी दि.३०.०६.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवक-युवतींसाठी मोफत कौशल्य प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

### नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी; स्वयंरोजगारासाठी तांत्रिक मार्गदर्शन व सहाय्य

धाराशिव (जिमाका) खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल (एथड) युवक-युवतींना आधुनिक तांत्रिक कौशल्यांच्या माध्यमातून रोजगारक्षम बनविण्यासाठी शासनाच्या महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे आणि इंडो-जर्मन टूल रूम (भारत सरकारची संस्था), छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.या उपक्रमातून युवक-युवतींना अत्याधुनिक तांत्रिक प्रशिक्षण पूर्णपणे नि:शुल्क उपलब्ध होणार असून,नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधींसह स्वयंरोजगारासाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन आणि सहाय्यही मिळणार आहे.

महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख उपक्रम राबवित आहे.

राज्यातील युवकांना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देऊन त्यांना उद्योग,सेवा आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात सक्षम बनविणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.शासनाच्या विविध योजनांची माहिती,मार्गदर्शन आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी अमृत सातत्याने कार्यरत आहे.

या विशेष उपक्रमाअंतर्गत अमृतच्या लक्षित गटातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल (एथड) युवक-युवतींना इंडो-जर्मन टूल रूम येथे अत्याधुनिक मशिनरी व उपकरणांच्या सहाय्याने उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार दर्जेदार प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षण,निवास आणि भोजनाचा संपूर्ण खर्च अमृत संस्थेमार्फत करण्यात येणार असल्याने पात्र उमेदवारांना कोणताही आर्थिक भार सहन करावा लागणार नाही.

प्रशिक्षणादरम्यान युवकांना आधुनिक औद्योगिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणार असून,प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.तसेच उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मार्गदर्शन,विविध शासकीय योजनांची माहिती आणि स्वयंरोजगारासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्यही उपलब्ध करून दिले जाणार आहे.

याशिवाय प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठीही प्रयत्न करण्यात येणार आहेत.या प्रशिक्षण कार्यक्रमात सीएनसी मशीन ऑपरेटर,मशीनिंग तंत्रज्ञान,उत्पादन व गुणवत्ता नियंत्रण,औद्योगिक देखभाल कौशल्ये,संगणक आधारित तांत्रिक प्रशिक्षण तसेच उद्योग क्षेत्रासाठी आवश्यक इतर कौशल्याधारित अभ्यासक्रमांचा समावेश आहे.या प्रशिक्षणासाठी खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल (एथड) घटकातील अमृतच्या लक्षित गटातील १८ ते ४० वर्षे वयोगटातील तसेच संबंधित अभ्यासक्रमानुसार आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेले उमेदवार पात्र राहतील.

इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी अमृत संस्थेच्या ु.ारहरर ीींीं.ीस.ळप या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावा.अधिक माहितीसाठी जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक चिन्मय कुलकर्णी यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी :अमृत संकेतस्थळ :ु.ारहररीींीं.ीस.ळप

जिल्हा अमृत कार्यालय : ऋणानुबंध, तळ मजला,वृंदावन कॉलनी,जिल्हा कारागृहासमोर,धाराशिव

संपर्क : ७३९१०६५४६९ / ९१३०३५४२९४ यावर संपर्क साधावा.

## विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ : बीएलओ ३० जून ते २९ जुलैदरम्यान प्रत्येक मतदाराच्या घरी

### धाराशिव तहसील कार्यालयात मदत कक्ष सुरू

धाराशिव (जिमाका)- भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या विशेष सखोल पुनरिक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रम २०२६ अंतर्गत दि.३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन भेट देणार आहेत.या भेटीदरम्यान मतदारांना एर्पीाशीरींळेप त्रेी (EF) वितरित करण्यात येणार असून,तो भरताना मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी बीएलओंना आवश्यक सहाय्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मतदारांनी गृहभेटीपूर्वी शक्य असल्यास voters.eci.gov.in संकेतस्थळ किंवा ECINet App वर मागील SIR मधील स्वत:चा अथवा आई-वडिलांचा तपशील (नाव, मतदारसंघ,यादी भाग क्रमांक व अनुक्रमांक) शोधून ठेवावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

गृहभेटीदरम्यान बीएलओकडून देण्यात आलेल्या गणना अर्जामध्ये आवश्यक माहिती भरून त्यावर स्वाक्षरी करून त्याची एक प्रत बीएलओकडे जमा करावी.तसेच त्याबाबतची पोच घेऊन अर्जाची एक प्रत स्वत:जवळ सुरक्षित ठेवावी, असेही सांगण्यात आले आहे.

दरम्यान,स्वत:चे किंवा आई-वडिलांचे नाव मागील डखठ मध्ये नसल्यास खालीलपैकी कोणतेही एक कागदपत्र तयार ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यामध्ये जन्माचा दाखला,पासपोर्ट, इयत्ता दहावी (मॅट्रिक) किंवा अन्य शैक्षणिक प्रमाणपत्र,रहिवासी प्रमाणपत्र,जात प्रमाणपत्र,सरकारी किंवा सार्वजनिक उपक्रमातील कर्मचारी अथवा निवृत्तीवेतनधारक ओळखपत्र,राज्य किंवा स्थानिक प्राधिकरणाची कुटुंब नोंदवही, शासनाने दिलेले जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र,वनहक्क प्रमाणपत्र,राष्ट्रीय नागरिक नोंदणीचा पुरावा,तसेच बँक,टपाल कार्यालय, जीवन विमा महामंडळ किंवा शासनाने १ जुलै १९८७ पूर्वी दिलेले ओळखपत्र अथवा प्रमाणपत्र यांचा समावेश आहे.याशिवाय आधार कार्डदेखील ओळख पुरावा म्हणून स्वीकारले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमादरम्यान धाराशिव तालुक्यातील मतदारांच्या शंका, अडचणींचे निरसन व मार्गदर्शन करण्यासाठी तहसील कार्यालय, धाराशिव येथील निवडणूक विभागात तालुकास्तरीय मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षात पुढीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

विरभद्र स्वामी - कक्ष प्रमुख - ७७७५०१४३१०

रविंद्र इरकल - सदस्य - ७८४०९२८९३८

अक्षय हजारे - सदस्य - ९३०९७१०७२८

आकाश झुंजारे - सदस्य - ८३२३०७८३९९

कोळगे अनिकेत - सदस्य - ८२६१०५६९४७

शुभम इसाळे - सदस्य - ७८८७५१२८२८

सतीश सोमाणी - सदस्य - ९६०४९००८१४

पुष्पराज तिर्थकर - सदस्य - ९४२२६६०३३३

धाराशिव तालुक्यातील सर्व नागरिकांनी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ संदर्भात कोणतीही शंका अथवा अडचण असल्यास मदत कक्षातील संबंधित कर्मचाऱ्यांशी संपर्क साधावा,असे आवाहन २४१-तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,धाराशिव तसेच २४२-उस्मानाबाद-कळंब विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,कळंब यांनी केले आहे.

## वसंतराव नाईक यांच्या विकास दृष्टीतून राष्ट्र निर्मितीची प्रेरणा मिळते : प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे शिल्पकार आणि दूरदृष्टीचे नेतृत्व लाभलेले स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांनी वसंतराव नाईक यांच्या कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर म्हणाले की, वसंतराव नाईक यांनी आपल्या प्रदीर्घ मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात शेती, जलसंधारण, ग्रामीण विकास, शिक्षण आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळाली. शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी राबविलेली धोरणे आजही प्रेरणादायी आहेत. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून समाजहिताची जाणीव बाळगावी आणि राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घ्यावा.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे, संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे त्याचबरोबर स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.बालाजी गुंड यांनी केले तर आभार श्री सचिन चव्हाण यांनी मानले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा.विवेकानंद चव्हाण कार्यालयीन प्रबंधक श्री सुमेर कांबळे , प्रसिद्धी प्रमुख डॉ. मारुती अभिमान लोंढे आदिसह सर्व गुरुदेव कार्यकर्ते जयंतीसाठी उपस्थित होते.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास मंजुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

## UPSC मुख्य परीक्षा व मुलाखत पूर्व तयारीसाठी अमृतकडून अर्थसहाय्य पात्र उमेदवारांनी १७ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करावेत

धाराशिव (जिमाका)- महाराष्ट्र संशोधन,उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तसेच अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा (पूर्व) परीक्षा २०२६ उत्तीर्ण उमेदवारांना मुख्य परीक्षेची व मुलाखतीची पूर्वतयारी करण्यासाठी प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य योजना (सन २०२६-२७) राबविण्यात येत आहे.

या योजनेचा लाभ अमृतच्या लक्षित गटातील ब्राह्मण,कायस्थ,कोमटी, मारवाडी, पाटील, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा,बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुंथर, गुजराती, जाट, हिंदू नेपाळी, भूमिहार, लोहारणा, कानबी आदी समाजघटकांतील पात्र उमेदवारांना मिळणार आहे.

सन २०२६-२७ मध्ये संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा (पूर्व) परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या आणि या आर्थिक सहाय्याचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत.

इच्छुक उमेदवारांनी https://mahaamrut.org.in/ या संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावा.अर्ज सादर करण्यापूर्वी संकेतस्थळावरील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक पालन करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.या योजनेंतर्गत पात्र उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी ५० हजार रुपये तर मुलाखतीच्या पूर्वतयारीसाठी २५ हजार रुपये इतके प्रोत्साहनात्मक अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

योजनेसंदर्भातील भविष्यातील सर्व सूचना व माहिती केवळ अमृतच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असून,ऑनलाइन अर्ज भरण्याबाबत अथवा योजनेसंदर्भात कोणतीही शंका असल्यास संबंधित जिल्हा अमृत कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेसाठी ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १७ जुलै २०२६ असून,पात्र उमेदवारांनी मुदतीपूर्वी अर्ज सादर करून या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.अमृत जिल्हा कार्यालय,धाराशिव

पत्ता : ऋणानुबंध,तळमजला, वृंदावन कॉलनी,जिल्हा कारागृह समोर,धाराशिव - ४१३५०१. संपर्क क्रमांक : ७३९१०६५४६९ / ९१३०३५४२९४ असा आहे.

अशी माहिती जिल्हा व्यवस्थापक, अमृत,धाराशिव यांनी दिली.

## शहरातील रस्ते जलमय, ग्रामीणमध्ये चाढ्यावर मूठ

ाराशिव(प्रतिनिधी)-जिल्हाभरात सोमवारी सर्वदूर पावसाने जोरदार हजेरी लावली. दुपारपासूनच ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर अचानक सुरू झालेल्या या पावसाने सायंकाळी ६ वाजेपर्यंत संततधार धरली. या मुसळधार पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. हवेत गारवा निर्माण झाला आहे. रस्ते जलमय झाले आहेत. तर सखल भागात पाणी साचले आहेत. समाधानकारक पाऊस झाल्याने ग्रामीण भागात काही ठिकाणी पेरणीस सुरुवात झाली आहे.

दुपारनंतर सुरू झालेल्या या पावसामुळे धाराशिव शहराच्या सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. मुख्य रस्त्यांवरून पाणी साचले होते. समाधानकारक पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची सुरुवात केली आहे.

मागील चार दिवसांपासून सतत पाऊस पडत असला तरी अनेक भागात दमदार पाऊस झालेला नाही. त्यामुळे पेरणीसाठी जमिनीत अपेक्षीत ओलावा झालेला नाही. मंगळवारी ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने पावसाची शक्यता व्यक्त केली जात आहे. चांगला पाऊस झाल्यास पेरण्यांना गती येणार आहे.

## आमदार कैलास पाटील विधानसभेत आक्रमक; मेडिकल कॉलेज टेंडर पासून रस्त्यांच्या कामांपर्यंत विचारला जाब




धाराशिव (शहा प्रतिनिधी शेख अंजुम)- धाराशिव जिल्ह्यातील विकासकामांतील कथित अनियमितता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारत बांधकामातील निविदा प्रक्रिया, अपूर्ण रस्ते आणि कंत्राटदारांच्या अडचणी यांसारखे अनेक महत्त्वाचे प्रश्न विधानसभेच्या पटलावर ठामपणे मांडत आमदार कैलास पाटील यांनी सरकारचे लक्ष वेधले. जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या पाटील यांनी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या (एमएसआयडीसी) कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करत निष्पक्ष चौकशीची मागणी केली.

धाराशिव येथील शासकीय मेडिकल कॉलेजच्या इमारत बांधकामाच्या टेंडर प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत त्यांनी संबंधित कागदपत्रांची सत्यता तपासण्याची मागणी केली. माहिती अधिकारातून मिळालेली कागदपत्रेही चुकीची असल्याचा आरोप करत त्यांनी निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचे सभागृहात नमूद केले.

याचबरोबर बार्शी-धाराशिव आणि धाराशिव-बोरफळ-औसा रस्त्यांच्या कामांतील विसंगतीही त्यांनी अधोरेखित केली. ग्रामीण भागातील अनेक रस्त्यांची कामे मंजूर होऊनही अपूर्ण असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून, अपघातांमध्ये निष्पाप जीव जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

एमएसआयडीसीमध्ये निविदा प्रक्रियेत गुणवत्ता आणि पात्रतेपेक्षा इतर निकषांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप करत, कंत्राटदारांच्या कागदपत्रांची काटेकोर तपासणी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली. सार्वजनिक निधीचा प्रत्येक रुपया योग्य ठिकाणी खर्च झाला पाहिजे, अशी भूमिका घेत त्यांनी मागील तीन ते चार वर्षांतील मंजूर कामे आणि निविदांची स्वतंत्र समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी केली.

सभागृहात बोलताना त्यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे अपेक्षा व्यक्त करत भ्रष्टाचाराला पाठीशी न घालता दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आवाहन केले. तसेच निवृत्त अधिकाऱ्यांऐवजी कार्यक्षम आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची गरजही त्यांनी मांडली.

यावर उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी धाराशिव मेडिकल कॉलेजच्या निविदा प्रक्रियेची फेरतपासणी करून आवश्यकतेनुसार फेरनिविदा काढण्यात येईल, तसेच इतर तक्रारींचीही चौकशी केली जाईल, असे सभागृहात स्पष्ट केले.

धाराशिवच्या विकासकामांबाबत सातत्याने पाठपुरावा करत जनतेच्या प्रश्नांना विधानसभेत ठामपणे वाचा फोडणाऱ्या आमदार कैलास पाटील यांच्या भूमिकेमुळे या प्रकरणाकडे आता राज्यभराचे लक्ष लागले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## नसरापूर प्रकरणी काय शिकणार...

भोर तालुक्यातील नसरापूर येथील साडेतीन वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना घडली होती. या प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांनी जलद तपास करत अवघ्या १४ दिवसात दोषारोपपत्र दाखल केले. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या पावणेदोन महिन्यात या खटल्याबाबत न्यायालयाने शिक्षा सुनावली असून भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. राज्यातील न्यायालयीन इतिहासात जलदगतीने सुनावणी झालेला नसरापूर अत्याचार प्रकरण हा पहिला खटला ठरला आहे. फास्ट ट्रॅकमध्ये निर्णय घेऊन न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली, याचे एक स्त्री म्हणून समाधान आहे. शिक्षा करूनही अजून शिक्षा करावीशी वाटते, असा एखादा गुन्हा असतो. असे फास्टट्रॅक निकाल लागले तर नराधम गुन्हा करताना दहा वेळा विचार करतील आणि त्यांच्या मनात भीती बसेल. आरोपीला तत्काळ फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी, यासाठी विविध संघटनांकडून आंदोलने करण्यात आली. तसेच कँडल मार्च देखील काढण्यात आले. गुन्हा घडल्यानंतर आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला तत्काळ अटक करून पोलिसांनी याचा जलद तपास सुरू केला. १४ दिवसात तपास पूर्ण करून यात सर्व पुरावे, डीएनए रिपोर्ट, मेडिकल रिपोर्ट करून ११०० पाणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. यानंतर न्यायालयात डे-टू-डे आणि इन-कॅमेरा सुनावणी झाली. १२५ साक्षीदारामधील ५५ साक्षीदारांना साक्षी समज देऊन त्यांची उलट तपासणी करण्यात आली. पुणे जिल्हा सत्र न्यायालयात विशेष न्यायाधीश एस. आर. साळूंखे यांनी या प्रकरणाचा निकाल देत आरोपी कांबळे याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या पावणेदोन महिन्यात या खटल्याबाबत शिक्षा सुनावण्यात आली. राज्यातील न्यायालयीन इतिहासात जलदगतीने सुनावणी झालेला नसरापूर अत्याचार प्रकरण हा पहिला खटला ठरला आहे. या निकालाने पीडित कुटुंबाला न्याय मिळाला आहे. या निकालाने न्याय व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारा आहे. न्यायालयाच्या या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत. यामुळे कायद्याचा धाक निर्माण होईल. भविष्यात महिलांना, मुलींना सुरक्षेसाठी कठोर पाऊल सरकारने उचलावी लागणार. मुळात अशी घटना का घडते. यामागील कारणांचा शोध घेतला पाहिजे. वाईट वृत्तीची काही माणसे असतात. त्याला समाजाने रोखले पाहिजे. सध्याला विकृत वृत्तीची व्यक्ती समाजात वावरत असेल तर त्यापासून सांभाळून राहीले पाहिजे. समाजात ही एक वृत्ती वाढत आहे ती म्हणजे सर्व बाबी सरकारने केल्या पाहिजेत. सरकार सर्व बाबीकडे लक्ष देवू शकत नाही. सरकार कायदा व सुव्यवस्थेकडे अधिक लक्ष देते. ते देताना सुद्धा मोठे परिश्रम घ्यावे लागतात. समाजात सर्व वाईट असतात असे नाही, चांगले ही व्यक्ती आहेत मात्र विकृत वृत्तीच्या ठराविकापासून सावध असले पाहिजे. ते ओळखण्याची जबाबदारी घरातील जेष्ठांची आहे. जेष्ठ मंडळीचा अनुभवामुळे ते सहज ओळखू शकतात. असे असले तरी जेष्ठ मंडळी ही घरात नाही तर वृद्धाश्रमात आहेत. ही वस्तूस्थिती जाणून घेतली पाहिजे. आई-वडील कामावर जातात. रात्रीच्यावेळी लहान मुलीस काही वस्तू बाजारातून आणण्यासाठी पाठविले जाते हे योग्य नाही. मुली रात्री-अपरात्री उशीरा घराबाहेर दिसतात हे योग्य नाही. एक तर मुली सुरक्षित नाहीत. त्यापेक्षाही वाईट बाब म्हणजे मुली स्वसंरक्षणात कमी पडतात. त्यांना शालेय जीवनात स्वसंरक्षणाचे धडे शिकविले पाहिजेत. जे काही शिकावयाचे आहे ते शालेय जीवनातच शिकायाला मिळते. महाविद्यालयीन नाही. त्यामुळे सरकार केवळ घोषणा करते अमलबजावणी कमी प्रमाणात करते. नसरापूरसारखी घटना पुन्हा घडली की, पुन्हा मुलींना आत्मसंरक्षणाबाबत विचार केला जातो. घटना घडल्यावर एक महिणा नुसती चर्चा होते, पुन्हा विसरले जाते, हे योग्य नाही. आजही या बाबत शालेय ऑडीट झाले नाही. शाळेत विद्यार्थ्यांना घेवून आणणाऱ्याबसेस सुरक्षित नाहीत. शाळेत अग्नीशामक सुरक्षा यंत्रणा दिसून येत नाही. विद्यार्थ्यांना संरक्षणार्थ धडे शिकविले जात नाहीत. वास्तविक गुरूकुलात सर्व ज्ञान दिले जाते तसे शालेय जीवनात दिलेच पाहिजे. सर्व प्रकारची विद्या दिली पाहिजे. केवळ पुस्तकिय ज्ञान देवुन चालणार नाही. केवळ बुद्धीवान बनून चालणार नाही. आरोग्य सदृढ असले पाहिजे. निरोगी जीवनच ही आरोग्याची गुरूकिल्ली आहे. ते शालेय जीवनात दिले जात नाही. तीन वर्षाची बालिका प्रतिकार करू शकत नाही हे योग्य आहे.जो नराधम वाईट वृत्तीचा आहे यावर पाळत ठेवून रोखता आले पाहीजे. आलिकडे कोणाला वेळ नाही. एका सर्वेनुसार एक व्यक्ती किमान चार तास मोबाईलमध्ये गुंतला जात आहे. पुर्वी टिव्ही समोर मालिका भरमसाठ पाहिल्या जात होत्या. त्यामुळे घरात कोण आले गेले याचे भान नव्हते. मुलामुलीकडे लक्ष देण्यात वेळ नव्हता. टिव्हीची जागा आता मोबाईलने घेतली आहे हे घातक आहे. पुर्वी मुलामुलीकडे लक्ष दिले जात असत. आपला मुल कोठे आहे हे घरातील व्यक्तीला माहिती होत असत. आता नाही. मोबाईलचा वापर वाढल्याने लबाड बोलणाऱ्याच्या संख्येत वाढ होत आहे. नसरापूर ही घटना भयानक आहे. विचार केला तर अशा विकृतीची व्यक्ती आपल्या आजूबाजूला आहे का नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. घटना घडल्यावर काळजी घेण्यापेक्षा घटना घडू नये याची दक्षता घेणे गरजेचे आहे. फाशीची शिक्षा सुनावली आहे, त्याची अमलबजाणीस वेळ लागणार आहे असे दिसून येते. शिक्षा झाली लागलीच अमलबजावणी होत नाही. त्यामुळे शासनाने सर्व शालेय जीवनात स्वसंरक्षाणाचे धडे सक्तीने द्यावीत. एखादा तास वाढवावा. त्याच प्रमाणे सर्व सरकार करेल ही मनोभावना सोडून द्यावी लागेल. आपले काय कर्तव्य आहे याचा विचार करून आपणच सतर्क असले पाहिजे. पुन्हा नसरापूरसारखी घटना होणार नाही याची खबरदारी सर्वांनी घ्यावी. त्याच प्रमाणे गुरुकुलीय शिक्षण पद्धतीचा स्विकार सक्तीने करावा. जो कोणी गुरुकुल पद्धतीचा स्विकार करणार नाही त्याची मान्यता रद्द करावी. सध्याला नको ते शिक्षण दिले जात आहे मात्र मुलांना स्वसंरक्षणाचे धडे सक्तीने देणे आवश्यक आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना मिळणार नवी उभारी!

आपल्या राज्याची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने शेती क्षेत्रावर अवलंबून असून, कष्टाळू शेतकऱ्यांच्या बळावरच राज्याची प्रगती होत असते; याच जाणिवेतून महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांचा गांभीर्याने विचार करून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना - २०२६' ही अत्यंत महत्त्वपूर्ण योजना जाहीर केली आहे. अनेकदा नैसर्गिक आपत्ती, अपुरा पाऊस अशा संकटांमुळे उत्पन्नात झालेली घट, यामुळे शेतकरी घेतलेले पीक कर्ज वेळेवर परत करू शकत नाहीत. त्यामुळे हे शेतकरी व्याजाच्या चक्रात अडकतात, अशा कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या राज्यातील अल्पभूधारक व मध्यमवर्गीय शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून त्यांना पुन्हा नव्याने शेती व्यवसायासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे व नवी




उभारी देणे हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा उद्देश आहे.

या योजनेच्या निकषानुसार, ज्या शेतकऱ्यांनी दिनांक १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत अल्पमुदत पीक कर्जाची उचल केली आहे आणि त्यांच्या एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील आपल्या हिश्श्याची अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर त्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच ही दोन लाखांवरील थकीत रक्कम भरण्यासाठी शेतकऱ्यांना ३१ मार्च २०२७ पर्यंतची मुदत दिली जाणार आहे.

यासोबतच, पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक वर्ष २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची उचल करून ३० जूनपूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची पूर्ण परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार असून, त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ व २०२६-२७ मधील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहणार आहे.

खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्यांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचावा यासाठी शासनाने निश्चित केलेले हे निकष अत्यंत पारदर्शक असून, ही योजना थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीशी जोडलेली असल्याने लाभाची रक्कम मध्यस्थांच्या हस्तक्षेपाशिवाय थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर कमी होऊन त्यांना बँकांकडून पुन्हा नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना - २०२६' ही राज्यातील बळीराजाच्या सन्मानाची आणि त्यांच्या शेती व्यवसायाला बळ देणारी ठरणार आहे.

**- तानाजी घोलप,**
**प्र. जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

## बळीराजासाठी आश्वासक पाऊल...

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

सध्या संपूर्ण महाराष्ट्रात खरीप हंगामाची लगबग सुरू झाली आहे. बळीराजा पेरणीच्या कामात व्यस्त आहे. अशा मोक्याच्या वेळी राज्य सरकारने ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर करून ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी उभारी दिली आहे. राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारा हा ऐतिहासिक निर्णय आहे. ही केवळ एक कर्जमाफी नाही, तर शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याचा विश्वास आहे.

प्रशासकीय पारदर्शकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ घालून राबवण्यात येणारी ही योजना शेतकऱ्यांना पुन्हा सन्मानाने बँकिंग प्रवाहात




आणण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरेल. या योजनेच्या नावामागील प्रेरणा, त्यातील धोरणात्मक तरतुदींची सविस्तर माहिती आपण घेऊया.

महाराष्ट्र वारंवार अतिवृष्टी, गारपीट आणि दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तींना सामोरे जात असतो, ज्यामुळे शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकतो. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी, शेती क्षेत्रात 'दीर्घकालीन संरचनात्मक सुधारणा' (Long-term Structural Changes) सुचवण्यासाठी मुख्यमंत्री यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशींनुसार केवळ तात्पुरती मदत न देता, शेतकऱ्यांचे उत्पन्न स्थिर करण्याच्या उद्देशाने ही योजना आखण्यात आली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या एक आदर्श प्रशासक, रयतेचे कल्याण करणाऱ्या लोकमाता होत्या. त्यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून या योजनेचे नामकरण करत सरकारने त्यांच्या लोककल्याणकारी कार्याला अभिवादन केले आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' हा सरकारने महाराष्ट्राच्या ५६ लाख शेतकरी कुटुंबांना सन्मानाने जगण्यासाठी दिलेला आधार आहे. ३६ हजार ५८५ कोटी रुपयांच्या या गुंतवणुकीमुळे ग्रामीण भागातील क्रयशक्ती वाढेल. शेती क्षेत्राला हवी असलेली स्थिरता प्राप्त होईल. 'बळीराजाचे राज्य' खऱ्या अर्थाने अवतरण्यासाठी आणि शेतकऱ्याला पुन्हा स्वावलंबी बनवण्यासाठी शासनाने टाकलेले एक आश्वासक आणि दूरगामी असेच हे पाऊल आहे.

**- डॉ. श्याम टरके,**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, लातूर**

# आरशा पलीकडचा चेहरा म्हणजे मनाचा आरसा

आपल्या आयुष्यात घरातील आरसा नावाची वस्तु जीवाभावाची आहे. आरसा आरसा असतो प्रत्येकांना हवाहवासा असतो. आरसा आवडे सर्वांना अस म्हटल तरी वावग ठरणार नाही. सकाळी उठल्यावर प्रत्येक व्यक्ती आरशासमोर उभा राहतो. आरसा घरातील सर्व व्यक्तींची आवडती वस्तू आहे.

आपली छबी पाहणे, केसांची बट नीट करणे, डाग लपवणे, हसू पाहून मनाला धीर देणे हे दैनंदिन काम आरसात करतो. आरसा चेहरा दाखवतो-गोरा चेहरा, थकलेला चेहरा. आरशासमोर व्यक्ती स्वतः ला विसरतो. आरशासमोर उभा राहून कधी मनाचा आरसा पाहतो? घराबाहेर पडताना प्रत्येक व्यक्ती आरशात चेहरा पाहतो, पण मनाचा आरसा पाहण्यासाठी किती व्यक्ती थांबतात? खरंच, चेहरा मनातील विचारांचे दूत आहे. आरसा फक्त बाह्य देहाचा प्रतिबिंब दाखवतो. पण त्याच मोहात मन आपसूक अडकते.

सर्वांना इश्वराने दिलेल्या चेहऱ्यावरच्या सर्वात बोलक्या खिडक्या म्हणजे डोळे आपण ओठांवर खोटे हसू सजवू शकतो, शब्द जपून वापरू शकतो, पण डोळे? कोणी सुंदर डोळ्यांना पाहून डोळे जुलमी गडे म्हणत तर रेखीव डोळ पाहून शंकराचे डोळे म्हणत. लाभलेल्या सुंदर डोळ्याचे कौतूक करतांना तर आपण थकत नाही.

डोळ्याचे विशेष म्हणजे ते खरे बोलतांत. एका गुरूंनी एकदा शिष्याला विचारले, तू जगाशी खोटं बोलू शकतोस, पण तुझे डोळे खोटं बोलू शकतील का?शिष्याला मान खाली घालावी लागली. डोळे हे अंतःकरणाचे द्वार असतात; तिथे साचलेले दुःख, मनातली भीती किंवा ओसंडून वाहणारा आनंद लपवणे अशक्य असते. म्हणूनच म्हणतात की, चेहरा बदलता येतो, पण डोळ्यांतली भाषा ही निसर्गाची स्वाक्षरी असते, जी कधीही खोटं बोलत नाही.

आरसा सांगतो लेप खोटा आहे, मन फक्त गोंधळले. बाह्य रूपाच्या मागे धावे, सत्य पूर्णपणे हरवले.सकाळी झेंडा लावला, रात्री मुखवटा घातला-हे कशाचा खेळ आहे? मी आरशात स्वतःला बघतो, पण आतप दोन चेहरे खेळत आहेत.

आपण सौंदर्याची वस्तू वापरून चेहरा उजळवतो, पण खरा प्रकाश विचारांमधून येतो. चेहऱ्यावर लावलेली क्रीम काही तासांचे सौंदर्य देते, पण मनात लावलेले चांगले विचार आयुष्यभर चमकतात. मनात आत्मविश्वास असता चेहरा आपोआप तेजस्वी दिसतो. मनात इतरांबद्दल प्रेम असता सात्विक प्रकाश ओसंडून वाहतो.



मनात आदर असता नम्रता चेहऱ्यावर दिसते. मनातील हे भाव माणसाला खऱ्या अर्थाने सुंदर बनवतात. म्हणून मनातील प्रकाश पेटवा.

लोक पैसे, पद, प्रसिद्धी मागून आनंद शोधतात. पण खरा आनंद आतच असतो. आजी नेहमी म्हणायची, चेहऱ्यावरून मन ओळखता येते. लेख तेव्हा समजला नाही. आता आयुष्याच्या वळणावर स्पष्ट होते की चेहरा फक्त मांसरक्ताचा भाग नाही, चेहरा मनाचा नकाशा आहे. मनात जळजळ, द्वेष, घमंड वाढवले तर चेहरा कोरडा, वाकडा दिसतो. मनात प्रेम फुलवले तर चेहरा हसूने भरतो.

शरीर आजारी होण्यापूर्वी चेहरा इशारा करतो, पण आपण हा सत्य अनेकदा दुर्लक्ष करतो. थकवा, चिंता आणि ताण चेहरा वर लगेच दिसतात. बुद्धाला बघून प्रश्न येतो: बुद्धाच्या चेहर्यावर इतकी शांतता कशी? गौतम बुद्ध म्हणतात, मी इतरांना बदलण्याचा प्रयत्न थांबवला आणि स्वतःला ओळखले. तेव्हापासून माझा चेहरा शांत राहिला. बाह्य जग बदलण्यापेक्षा मन शांत करणे हेच सुंदर चेहरा आणि आनंदी आयुष्याचे रहस्य आहे.

आरसा कधीही खोटे बोलत नाही. आरसा फक्त तुमचा चेहरा दाखवतो. खरा आरसा तुमच्या कामात आणि विचारात दिसतो. म्हणून चेहरा सुंदर करण्यावर लक्ष देऊ नका. त्याऐवजी मन सुंदर करा. आनंदाचा स्रोत बाहेर नाही. आनंदाचा स्रोत तुमच्या अंतर्मनात सतत वाहतो. जेव्हा आनंदाचा स्रोत वाहू लागेल, चेहऱ्यावर नैसर्गिक तेज दिसेल. नैसर्गिक तेजाला कोणत्याही अलंकाराची गरज नाही. आरसा पाहून स्वतः ला हसण्याचा प्रयत्न करा.

आरसा पाहून स्वतःला हसण्याऐवजी, आरशापलीकडे तुमचे मन हसवा. मग चेहरा आपोआप आनंदाने उजळेल. आरशात नेहमी चेहरा बघतो, रोज मुखवटा घालून फिरतो. मनाच्या आरश्यात बघताना, आज ओज मिळेल का? चेहरा बदलण्याचा प्रयत्न थांबव, आतमध्ये उजळ प्रकाश शोध. विचारांची बाग फुलव, चेहऱ्यावर खरा आनंद दिसेल.

## आरशा पलीकडचा चेहरा

सकाळ होताच आरसा उभा, बाह्य रूपाच्या ओढीला,
केसांच्या बट नीट करण्याच्या, नित्य रोजच्या सवयीला.
चेहरा माझा पाहताना, मी स्वतःलाच विसरतो,
आरशातल्या त्या प्रतिमेच्या, मोहात पुरता अडकतो.
आरसा हसून हळूच म्हणाला, ''रे मानवा तू ऐक जरा,
मी फक्त दाखवतो वरचा लेप, तुझ्या रूपाचा हा पसारा!
मी रेषा मोजू शकतो केवळ, चेहऱ्याच्या या कातडीवर,
पण मनाच्या तळाशी साचलेले, दुःख मोजू मी कोण्या थरावर?
डोळे म्हणजे खिडकी सत्याची, ते कधीही न बोलती खोटं,
मनातल्या त्या वादळाला, ओठांवरचं हसू न देई ओठं!
चेहरा दिसतो उजळला, तरी मन जणू कोमेजलेले,
विचारांच्या धुलिकणांनी, आरशाचे हे रूप झाकलेले.
मनात जर अहंकाराची, वाढली असतील काट्यांची झुडपे,
तर चेहऱ्यावर उमटतील केवळ, मत्सराची ती ती कुरुपे.
पण प्रेमाच्या फुलांची बाग, जर अंतरात फुलवली,
तर चैतन्याची कस्तुरी, चेहऱ्यावर आपसूक उमलली.
आरसा फक्त मुखवटा दाखवी, मनच खरा चेहरा घडवी,
शांततेचा चंद्रप्रकाश, अंतर्मनातूनच उजळवी.
कस्तुरीमृगासारखा वणवण, का शोधतोस बाहेर तू आनंद?
तुझ्याच अंतरंगात वाहे, आनंदाचा एक निर्मळ ''झरबंध''.
आरशापलीकडचा चेहरा, आता तू ओळखायला शिक,
स्वतःला शोधण्याच्या प्रवासात, मनाचा दीप प्रज्वलित कर एक!
कारण आरसा दाखवतो फक्त शरीर, मनच तुझे रूप आहे,
स्वच्छ विचारांच्या कमळाने, फुललेले हे सुंदर स्वरूप आहे.

आरशा पलीकडचा चेहरा,
आता तू ओळखायला शिक



राहूल हरीभाऊ इंगळे पाटील
मोबाईल - ९८९०५७७७१२८
रा. करकटटा ता.जि.लातूर

# कर्तव्य आणि सेवेचा सुवर्ण संगम : डीएनबी गोल्ड मेडलिस्ट डॉ. रोहित दीक्षित



हृदयाची काळजी घेणारा डॉक्टर जेंव्हा एका शहराच्या गळ्यातील टाई बनतो तेंव्हा नातेसंबंधाना एक वेगळाच जिव्हाळा प्राप्त होतो. सातारा येथील सुप्रसिद्ध आणि अत्यंत नावाजलेले हृदयरोग तज्ञ डॉ. रोहित दीक्षित साहेब हे केवळ सातारकरांचे गळ्यातील ताईत आहेत असे नाही तर ते सोलापूर चे लाडके जावई देखील आहेत. सोलापूर शी जोडलेले हे हक्काचे आणि स्नेहाचे नाते त्यांनी आपल्या कर्तृत्वाने अधिकच दृढ केले आहे. वैध्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च शिखर सर करतानाच, त्यांनी आपल्यातील संवेदनशीलता आणि सेवाभाव नेहमी जपला आहे. अत्यंत विनम्र स्वभाव आणि रुग्णाप्रती असलेली अपार निष्ठा ही त्यांची खरी ओळख आहे.

संस्कार, विचार आणि सेवाभावातून घडलेले कर्तृत्व म्हणजे सातारचे सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. रोहित प्रकाश दीक्षित. सोलापूरचे जावई असलेले डॉ. दीक्षित हे सुवर्णकार – सोनार समाजाचे भूषण असून त्यांच्या वैद्यकीय व सामाजिक कार्याची दखल घेत सोलापूर सोनार समाज संस्थेने सन २०२३ मध्ये 'समाजभूषण' पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

डॉ. रोहित दीक्षित यांचा सोलापूरशी जवळचा संबंध आहे. सोलापूरचे जावई म्हणून त्यांनी नेहमीच या भूमीशी आपुलकी जपली आहे. सुवर्णकार सोनार समाजाच्या प्रत्येक कार्यात ते सक्रिय सहभाग नोंदवतात. त्यांच्या याच योगदानाचा गौरव म्हणून सोलापूर सोनार समाज संस्थेने त्यांचा 'समाजभूषण' किताबाने सन्मान केला. हा सन्मान केवळ त्यांचा नसून संपूर्ण सोलापूरकरांसाठी अभिमानाचा क्षण आहे.

वैध्यकीय क्षेत्रातील सुवर्ण कामगिरी –

डीएनबीमेडिसिन, डीएनबीकार्डीयॉलॉजि (गोल्डमॅडलिस्ट) एफएससीसी, एफएससीएएल, सीअरएफसी, फेलो अमेरिकन कॉलेज ऑफ कॉर्डिंयॉलॉजि अशा उच्च पदव्या प्राप्त डॉ. दीक्षित यांचे 'दीक्षित हार्ट केअर', सातारा हे केंद्र रुग्णसेवेसाठी प्रसिद्ध आहे. बहुतेक डॉक्टर मांडीच्या शिरेतून अँजिओप्लास्टी करतात, मात्र डॉ. रोहित दीक्षित आपल्या कौशल्याने हाताच्या शिरेतून शस्त्रक्रिया करतात, ही त्यांची खासियत आहे.

सातारा जिल्ह्यातील एकमेव कार्डिओलॉजी सेंटर –

जिथे Rotaablation Angioplasty with IVUS Oct, Bundle Branch Pacing, TEE, Balloon Mitral Valvotomy या अत्याधुनिक शस्त्रक्रिया केल्या जातात. साई अमृत मल्टीस्टेट येथे अचूक निदान आणि योग्य उपचारामुळे ते रुग्णांच्या पसंतीस उतरले आहेत.

सामाजिक बांधिलकीतून सेवा–

'आपण समाजाचे देणे लागतो' या भावनेतून त्यांनी 'जीवन ज्योती सामाजिक संस्थेची' साखरवाडी येथे स्थापना केली. संस्थेमार्फत दरवर्षी मोफत आरोग्य शिबिरे, महिला व बाल तपासणी शिबिरे घेतली जातात. कोरोना काळात गरीबांना मोफत शिधावाटप तर आषाढी वारीनिमित्त वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर हे उपक्रम अखंडपणे सुरू आहेत.

आदर्श सुवर्णकार कुटुंब –

भाडळे, ता. कोरेगाव येथील दीक्षित कुटुंब हे उच्चशिक्षित व आदर्श आहे. पत्नी डॉ. प्रिया दीक्षित एम. डी. आयुर्वेद सातारमध्ये कार्यरत आहेत. संपूर्ण कुटुंब वैद्यकीय व प्रशासकीय सेवेत कार्यरत असून सुवर्णकार – सोनार समाजाचे नाव उज्वल करत आहे. विद्येचे सुवर्णपदक असो वा जागतिक पातळीवरील,'अमेरिकन कॉलेज ऑफ फेलो ' चा बहुमान डॉ. रोहित दीक्षित यांनी यशाच्या शिखरावर पोहोचूनही आपले पाय जमिनीवर ठेवले आहेत. त्यांना या सेवाकार्यात त्यांची अर्धांगिनी डॉ. प्रिया दीक्षित यांची खंबीर साथ लाभली आहे. हे वैध्यकीय दाम्पत्य दरवर्षी मोफत आरोग्य शिबिराच्या माध्यमातून गरजू महिला, बालके आणि रुग्णांची तपासणी करून समाजाचे ऋण फेडत आहे. सातारा ही त्यांची कर्मभूमी असली, तरी सोलापूरच्या जावयाने आपल्या कार्याने दोन्ही घराण्यांचा आणि दोन्ही शहरांचा मान वाढवला आहे. वैध्यकीय कौशल्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या डॉ. रोहित दीक्षित यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस आणि लोकसेवेस मनःपूर्वक शुभेच्छा.

सोलापूर सोनार समाज संस्थेला डॉ. रोहित दीक्षित यांचा सार्थ अभिमान आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा!

संपर्क : डॉ. रोहित प्रकाश दीक्षित, सातारा यांचा संपर्क क्र .९७६६६२९१३५, ७०२८६८७५५१ असा आहे.

**– वसंत पोतदार**
**सोनार समाज संस्था, सोलापूर.**

# 'वारकऱ्यांच्या 'चरण सेवेला' प्रारंभ' भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ! : मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा उपक्रम

**मुंबई/प्रतिनिधी:** आषाढी वारीदरम्यान पंढरपूरकडे पायी जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा आणि चरणसेवेचा लाभ मिळावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील 'चरणसेवा' उपक्रम यंदाही राबविण्यात येत आहे.

राज्यातील ११ जिल्ह्यांतील पालखी मार्गावरील सुमारे ४०० मुक्कामस्थळी हा उपक्रम राबविण्यात येणार असून, १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज राहणार आहेत. वारकऱ्यांच्या पायांवरील ताण कमी करण्यासाठी सुमारे ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेलाद्वारे पायांची मालिश, फिजिओथेरपी, प्राथमिक उपचार, वैद्यकीय तपासणी तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संबंधित रुग्णालयात संदर्भित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच गरजेनुसार रुग्णवाहिका सेवाही सज्ज ठेवण्यात आली आहे.




याशिवाय, पालखी मार्गावर ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती, स्वच्छतेचे महत्त्व, संसर्गजन्य व पावसाळ्यातील आजारांपासून बचाव, निरोगी जीवनशैली आणि प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक मार्गदर्शन वारकरी व नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे.

कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले की, गतवर्षी 'चरणसेवा' उपक्रमाला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमातून १ लाख ७५ हजारांहून अधिक वारकऱ्यांना थेट चरणसेवा, वैद्यकीय तपासणी आणि उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, तर १० लाखांपेक्षा अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यात आला. यंदा ११ जिल्ह्यांतील सुमारे ४०० सेवा केंद्रांवर १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक कार्यरत असून, ३ हजार लिटर औषधी आयुर्वेदिक तेल, रुग्णवाहिका सेवा आणि ८ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून अधिक व्यापक स्वरूपात सेवा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक वारकऱ्यांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित 'चरणसेवा' उपक्रमातून वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाला आधुनिक वैद्यकीय सेवेची जोड देण्यात आली असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने सर्व वारकरी, दिंडी प्रमुख आणि पालखी मार्गावरील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# सरस्वती महाविद्यालयात कृषी दिनानिमित्त वृक्षारोपण




**लातूर/प्रतिनिधी:** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १ जुलै कृषी दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै हा दिवस 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो. कृषी क्षेत्रातील स्व .वसंतराव नाईक यांच्या मौलिक योगदानाबद्दल हा दिवस राज्यभर उत्साहात साजरा करण्यात येतो.

कृषी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाप्रसंगी प्रा.अमोल जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वृक्षारोपणाचे आणि वृक्षसंगोपणाचे महत्व पटवून देताना झाडे लावा ,झाडे जगवा,पर्यावरण वाचवा असा संदेश त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

या प्रसंगी सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर येथील प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग गोरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी शिंदे, डॉ.वसंत बंडे, प्रा . रवि चव्हाण , डॉ. सुदाम पवार, प्रा. अमोल जाधव,डॉ. संतोष कुलकर्णी , डॉ. राम खलंग्रे, डॉ. मोनालिसा खानोरकर , प्रा .ज्योती मामडगे, प्रा.सलील शहाजिंदे, प्रा.श्रीमंत दोरवे,प्रा.तुकाराम येमले,श्री. विठ्ठल चव्हाण, श्री. बळीराम कदम, सौ. भागीरथी लाड तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात वसंतराव नाईक जयंती उत्साहात साजरी

**बाभळगाव/प्रतिनिधी:** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती सांस्कृतिक विभागाच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या कृषी, ग्रामीण विकास आणि लोककल्याणकारी धोरणांचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग मुंढे यांनी केले. त्यांनी वसंतराव नाईक यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचा, कृषी क्षेत्रातील योगदानाचा आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला.




प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या कृषी विकासाला दूरदृष्टीची दिशा दिली. शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, याची जाणीव त्यांनी आपल्या धोरणांतून करून दिली. आधुनिक तंत्रज्ञान, जलसंधारण आणि शाश्वत शेतीचा स्वीकार केल्याशिवाय कृषी क्षेत्राची प्रगती शक्य नाही. विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्रातील संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकतेकडे सकारात्मक दृष्टीने पाहून ग्रामीण विकासात आपले योगदान द्यावे. वसंतराव नाईक यांचे कार्य आजही नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे.

कार्यक्रमास स्टाफ सचिव प्रा.चंद्रकांत मोरे, डॉ. अजित भांजी, डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ.जयदेवी पवार, प्रा. शिल्पा हालसिकर, प्रा. बालिका गौड, डॉ. दशरथ भिसे, डॉ. माधव गायकवाड, प्रा. महारुद्र बिडवे, डॉ.शाहूराज मुळे, प्रा.सोपान डोपे, डॉ.अभिजीत बादाडे, डॉ.सुरेशकुमार कांबळे, ग्रंथपाल डॉ. महावीर कटके, प्रा. ज्ञानदेव कांबळे, प्रा. विवेक कदम, राजकुमार कांबळे, प्रा. संदीप चेवले, प्रा. संतोष कल्याणकर, वसंत मस्के यांची उपस्थिती होती.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता फुलगामे, बालाजी देशमुख यांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# आयआरसीटीसीकडून सोलापूरहून सप्त ज्योतिर्लिंग श्रावण विशेष यात्रा भारत गौरव पर्यटक रेल्वेची घोषणा

* १३ रात्री/१४ दिवसांच्या विशेष आध्यात्मिक यात्रेत प्रमुख ज्योतिर्लिंगे व पवित्र तीर्थक्षेत्रांचे दर्शन
* ही विशेष आध्यात्मिक यात्रा ११ ऑगस्ट २०२६ रोजी सोलापूर येथून प्रारंभ होणार

**सोलापूर/प्रतिनिधी:** रेल्वे मंत्रालयाच्या अधिपत्याखालील नवरत्न सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असलेल्या भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळाने (आयआरसीटीसी) भारत गौरव पर्यटक रेल्वे उपक्रमांतर्गत सप्त ज्योतिर्लिंग श्रावण विशेष यात्रा सुरू करण्याची घोषणा केली आहे. ही विशेष आध्यात्मिक यात्रा ११ ऑगस्ट २०२६ रोजी सोलापूर येथून प्रारंभ होणार असून भाविकांना देशातील प्रमुख ज्योतिर्लिंगे आणि पवित्र तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देणार आहे.



१३ रात्री आणि १४ दिवसांच्या या विशेष यात्रेची आखणी श्रावण महिन्याच्या पावन पर्वानिमित्त करण्यात आली असून श्रद्धा, अध्यात्म, सांस्कृतिक वारसा आणि आरामदायी प्रवासाचा अनोखा संगम या यात्रेत अनुभवता येणार आहे. या यात्रेदरम्यान भाविकांना द्वारकाधीश मंदिर (द्वारका), सोमनाथ ज्योतिर्लिंग (वेरावळ), महाकालेश्वर ज्योतिर्लिंग (उज्जैन), त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग (नाशिक), घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग (छत्रपती संभाजीनगरजवळ) आणि मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग (मार्कापूर) येथे दर्शन घेता येणार आहे.

याबाबत माहिती देताना श्री गौरव झा, समूह महाव्यवस्थापक, आयआरसीटीसी पश्चिम विभाग, यांनी सांगितले की या विशेष भारत गौरव पर्यटक रेल्वेमध्ये सुमारे ७५० प्रवाशांची क्षमता असून प्रवाशांसाठी इकॉनॉमी स्लीपर (SL), स्टँडर्ड 3AC आणि कम्फर्ट 2AC अशा तीन श्रेणी उपलब्ध असतील.

या यात्रेसाठी सोलापूर, कुर्डुवाडी, दौंड, पुणे, लोणावळा, कर्जत, कल्याण, वसई रोड, डहाणू रोड, वापी आणि सुरत या स्थानकांवरून चढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे मोठ्या संख्येने भाविकांना या यात्रेचा लाभ घेता येईल.

**या सर्वसमावेशक पॅकेजमध्ये खालील सुविधा समाविष्ट आहेत:**

एसी व नॉन-एसी डब्यांमधून आरामदायी रेल्वे प्रवास बजेट हॉटेलमध्ये दुहेरी, तिहेरी किंवा चौघांच्या सामायिक निवासाची व्यवस्था संपूर्णप्रवासादरम्यानशुद्धशाकाहारीभोजन स्थानिक पर्यटन व दर्शनासाठी एसी/नॉन-एसी वाहनांची सुविधा सर्वसमावेशक प्रवास विमा प्रवासाच्या सुरळीत व्यवस्थापनासाठी अनुभवी आयआरसीटीसी टूर मॅनेजर्सची सेवा प्रवाशांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सोयीसुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत आयआरसीटीसीने सर्व आवश्यक उपाययोजना केल्या असून भाविकांना सुरक्षित आणि आनंददायी प्रवासाचा अनुभव मिळेल याची खात्री करण्यात आली आहे.

**या यात्रेचे प्रति व्यक्ती पॅकेज शुल्क पुढीलप्रमाणे आहे:**

इकॉनॉमी स्लीपर (SL): २४,०५०
स्टँडर्ड 3AC: ३९,७३०
कम्फर्ट 2AC: ५२,४००

या यात्रेसाठी नोंदणी 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर सुरू असून इच्छुक प्रवासी आयआरसीटीसीच्या पर्यटन पोर्टलवरून आपली नोंदणी करू शकतात.

अधिक माहितीसाठी व आरक्षणासाठी प्रवाशांनी ८२८७९३१८८६ या क्रमांकावर संपर्क साधावा किंवा bgtmumbaiirctc.com या ई-मेलवर संपर्क साधावा.

डॉ. ए. के. सिंह, प्रवक्ते, आयआरसीटीसी पश्चिम विभाग, यांनी सांगितले की हा उपक्रम देशातील आध्यात्मिक पर्यटनाला चालना देण्याबरोबरच भाविकांना सुरक्षित, परवडणारा आणि सुविधायुक्त प्रवासाचा अनुभव देईल. भारत गौरव पर्यटक रेल्वे उपक्रमाद्वारे देशाची समृद्ध धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आयआरसीटीसीचे प्रयत्न सुरू राहतील.

# आमदार विक्रम काळे यांच्या वाढदिनी शैक्षणिक साहित्याचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी:** मराठवाड्याचे कर्तव्यदक्ष शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या वाढदिवसानिमित्त राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते बुधवारी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

आमदार विक्रम काळे हे मागील तीन टर्मपासून छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार आहेत. या कार्यकाळात त्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांच्या विविध प्रश्नांचा शासनदरबारी पाठपुरावा करून ते मार्गी लावले. आमदार काळे यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने संकुलातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून आमदार काळे यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, संचालक मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, संचालक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर यांच्यासह संकुलातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८, २४५४०९

# वटपौर्णिमेनिमित्त जिल्हा परिषद मानमोडी येथे वटवृक्षाची लागवड व पूजन



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट परिसरातील आय एस ओ मानांकन प्राप्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मानमोडी येथे परिसरामध्ये कुठेच वडाचे झाड नसल्यामुळे वटपौर्णिमेनिमित्त महिलांना पूजन करण्यासाठी शाळेच्या परिसरात शाळेचे मुख्याध्यापक श्री विक्रम पाचंगे यांनी व त्यांच्या शिक्षक वृंदांनी शाळेत वडाचे झाड लावून सर्व महिलांना पूजन करण्यासाठी स्वच्छ व सुंदर परिसर करून दिला त्याबद्दल गावातून सर्व शिक्षकांचे कौतुक होत आहे. त्याचबरोबर पाचंगे सर यांनी भारतीय संस्कृतीची जपणूक आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम घडवून वडाचे महत्व तथा विविध मनोरंजन करणारे खेळ तथा महिलांनी आपल्या सौभाग्यास दीर्घायुष्य लाभावे म्हणून वडाचे पूजन केले तसेच परिसरामध्ये प्रत्येक कुटुंबामध्ये वडाचे एक रोप लावून आपला परिसर शुद्ध ऑक्सिजन युक्त बनवण्याची शपथ घेतली यावेळी शालेय व्यवस्थापन समिती सदस्य सर्व शिक्षक वृंद तथा गावातील सर्व महिला व विद्यार्थी उपस्थित होते.

# शासकीय ग्रंथालय अधिकारी कार्यालयात वसंतराव नाईक जयंती उत्साहात साजरी!



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांची जयंती जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धाराशिव येथे उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते विजय गायकवाड यांच्या हस्ते स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे विजय गायकवाड यांनी स्व.वसंतराव नाईक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना सांगितले की, स्व. वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राच्या कृषी विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

शेती सिंचनाखाली आणण्यासाठी विविध जल प्रकल्पांची उभारणी केली तसेच त्यांच्या दूरदृष्टी नेतृत्वामुळे शेती, उद्योग आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये मोठे परिवर्तन घडून आले.

यावेळी ग्रंथालयीन कर्मचारी शिवशंकर कटाळे, प्रफुल्लचंद्र राठोड तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी उपस्थित होते.


## NAME CHANGE DECLARATION

Here in this advertisement, I hereby declare that I have changed my name, which was:
**LAIBA ANAM SAMIOUDDIN**
TO -**MANIYAR LAIBA ANUM SAMIOUDDIN**.
Henceforth, I shall be known by the name MANIYAR LAIBA ANUM SAMIOUDDIN, and I will use this name for all purposes in the future.
OLD NAME :-
**LAIBA ANAM SAMIOUDDIN**
NEW NAME:- **MANIYAR LAIBA ANUM SAMIOUDDIN**
ADDRESS:- BUS STAND
Samarth Nagar, Opposite Scan Near Masjid, Osmanabad-413501, Maharashtra.
AADHAAR NO.:- 223117623911
MOBILE NO.:- 9699232100
I request all concerned to kindly note and update my name in all records and documents.
PLACE: OSMANABAD
DATE: 06/06/2025

## NAME CHANGE DECLARATION

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : KAZI FASIODDIN YOSUFODDIN TO: KAZI FASIODDIN YUSUFODDIN
Hence for this Declaration i will be known by this name and will use KAZI FASIODDIN YUSUFODDIN in future the same will used by my family husband /wife, children and relative.
**OLD NAME :-** KAZI FASIODDIN YOSUFODDIN
**NEW NAME** : KAZI FASIODDIN YUSUFODDIN
**Address** - Kazi Galli Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
**Adhar no.**-409755983263
**Mob**.87304342347


# भाचीला न्याय मिळेपर्यंत मामाचे धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

धाराशिव (प्रतिनिधी)- भुम तालुक्यातील हाडोंगी येथील संजय पोपट वाघमारे यांनी त्यांच्या भाचीवर झालेल्या कथित अन्यायाविरोधात आज (३० जून) सकाळपासून धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

संजय वाघमारे यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात आरोप केला आहे की, वाणेवाडी येथील संबंधित कुटुंबाने त्यांच्या मुलाबाबत महत्त्वाची माहिती लपवून ठेवत त्यांच्या भाचीशी विवाह लावून दिला. त्यानंतर विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ करण्यात आला असून तिची बदनामीही करण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.याप्रकरणी २९ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय तसेच आनंदनगर पोलिस ठाण्यात निवेदन दिले होते. मात्र अद्याप ठोस कारवाई झाली नसल्याने विवाहितेला न्याय व तिचे कायदेशीर हक्क मिळावेत, या मागणीसाठी ३० जूनपासून आमरण उपोषण सुरू करण्याचा



निर्णय घेतल्याचे वाघमारे यांनी म्हटले आहे.

संबंधित प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन विवाहितेला न्याय मिळावा तसेच तिच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# उमरगा तालुक्यात २ दिवस पाऊस, बळीराजाने धरली चाढ्यावर मूठ

उमरगा अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर मान्सूनने तालुक्यातील माडज, एकुरगा, त्रिकोळी, मुळज, तुरोरी, हिप्परगा या भागात चांगली हजेरी लावत शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. शनिवारी अचानक वातावरणात बदल होऊन काळे ढग दाटून आले आणि काही वेळातच जोरदार पावसाला सुरुवात झाली. जवळपास दोन ते अडीच तास झालेल्या पावसामुळे शेतात पाणी साचले होते. रविवारी सकाळी दुसऱ्या दिवशीही पावसाने चांगलीच हजेरी लावली. यामुळे गरमीमुळे हैराण झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकरी राजा सुखावला आहे तर सोमवारी तालुक्यातील काही ठिकाणी शेतकऱ्यांनी पेरणीलाही सुरुवात केली आहे.

मृग निघाल्यापासून शेतकऱ्यांना समाधानकारक पावसाची प्रतीक्षा होती. शेतकरी वर्ग चिंतेत होता. पावसाअभावी पेरण्या रखडल्या होत्या. शेतकरी आभाळाकडे डोळे लावून चातकाप्रमाणे वाट पाहात होते. शेतातील सर्व मशागतीचे कामे पूर्ण आटोपून पाऊस येईल की नाही यासाठी चिंतातूर झाले होते. पेरणीसाठी लागणारे बी-बियाणे, खत व इतर साहित्याची खरेदी करून ठेवली होती. शेतीसाठी आवश्यक असलेली ओल जमिनीत नसल्याने शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले होते. अशा परिस्थितीत तालुक्यातील काही भागात झालेल्या झालेल्या दमदार पावसामुळे शेतकरी तूर्ततरी सुखावला आहे. ट्रॅक्टरची चाके शेत बंधाऱ्यावर फिरताना पाहून शेतकरी सध्या तरी थोडाफार उत्साही दिसत आहे. कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना जमिनीतील ओल लक्षात घेऊन योग्य वेळी पेरणी करण्याचा तसेच बीजप्रक्रिया करूनच बियाण्यांचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

पेरणीचा दर १०००, डिझेल मिळते फक्त २० लिटर : पेरणीचे दर वाढले आहेत. पूर्वी ८०० रुपये प्रतिएकर पेरणीचे दर होते. आता १००० प्रतिएकर पेरणी केली जाते. शेत कुळवणीचे दर पूर्वी ७०० रुपये प्रतिएकर होते सध्या ८५० रुपये प्रतिएकर कुळवणी केली जाते. डिझेल मिळण्यासाठी सुरुवातीला अडचण अडचणी येत होत्या. कॅनमध्ये अजूनही २० लिटर डिझेल देत आहेत. दिवसातून दोन तीन वेळा डिझेल आणावे लागत आहेत. जूनअखेर तालुक्यात ९४.८० मिमी पाऊस उमरगा तालुक्यातील जून महिन्याची पावसाची वार्षिक सरासरी ११०.७० इतकी आहे. जून महिन्याअखेर तालुक्यात ९४.८० मिमी पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद मुळज मंडळात झाली असून, मुळज मंडळात १३३.२० मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर डाळिंब मंडळात सर्वात कमी पावसाची नोंद झाली आहे.

# ४७० कारवाया करुन ४,१७,००० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.३० जुन रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ४७० कारवाया करुन ४,१७,००० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

# वटपौर्णिमेनिमित्त वडासह अन्य वृक्षांची लागवड

भूम(प्रतिनिधी)-शहरात वटसावित्री पौर्णिमा सोमवारी मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. वटवृक्षाची मनोभावे पूजा-अर्चा करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करत महिलांनी जन्मोजन्मीचे नाते दृढ करण्याचा संकल्प केला. दुपारी एक वाजल्यापासून साजशृंगार केलेल्या सुवासिनी आणि नवविवाहित महिलांनी शहरातील विविध वटवृक्षांजवळ गर्दी केली होती. हिंदू धर्मात वटसावित्री पौर्णिमेला अनन्यसाधारण महत्त्व असून सावित्री-सत्यवानाच्या पौराणिक कथेशी हा सण जोडलेला आहे. या परंपरेनुसार महिलांनी मोठ्या श्रद्धेने वटवृक्षाची पूजा करून व्रताचे पालन केले.

उमरगा शहरातील ऐतिहासिक बालाजी मंदिराजवळील वडाचे झाड, कल्याणसागर शाळेलगत असलेला वटवृक्ष तसेच शहरातील अन्य ठिकाणच्या वडाच्या झाडांजवळ महिलांनी पूजा-अर्चा केली. वटवृक्षाला सुती दोरा बांधून सात प्रदक्षिणा घालत पतीच्या दीर्घायुष्याची आणि कुटुंबाच्या सुख-समृद्धीची प्रार्थना केली.

# येणेगूर येथे शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन

येणेगूर (प्रतिनिंधी)--आगामी खरीप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी आणि शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी तालुका कृषी अधिकारी, उमरगा यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे येणेगूर येथे 'एक दिवस बळीराजासाठी' हे अभियान अत्यंत उत्साहात पार पडले. या मोहिमेत परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती घेतली.

कार्यक्रमाच्या पूर्वार्धात कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी खरीप हंगामाच्या नियोजनाबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. मंडळ कृषी अधिकारी एस. टी. शिंदे यांनी बीजप्रक्रिया आणि पिकांचे अन्नद्रव्य व्यवस्थापन यावर प्रकाश टाकला. विशेषतः चालू वर्षी 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर निर्माण होणाऱ्या संभाव्य हवामान परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांनी कोणत्या उपाययोजना कराव्यात, याचे महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले.

या कृषी जागृती अभियानाला परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि प्रगतशील शेतकऱ्यांची उपस्थिती लाभली. यामध्ये पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी उमेश पाटील, राजेंद्र बनसोडे, सुरेश हुळमजगे, नागनाथ हुळमजगे, प्रगतशील शेतकरी उत्तम सगर आणि सतीश जाधव यांचा प्रामुख्याने समावेश होता.

या संपूर्ण उपक्रमाचे नेटके आणि शिस्तबद्ध नियोजन सहाय्यक कृषी अधिकारी जी. बी. शेख यांनी केले. तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक कृषी अधिकारी अविष्कार भालेराव, बळीराम जाधव, राहुल घुगरे, सुनंदा सूर्यवंशी व ज्योती कदम यांनी विशेष परिश्रम घेतले.

या अभियानामुळे येणेगूर व परिसरातील शेतकऱ्यांना आगामी खरीप हंगामासाठी योग्य दिशा मिळाली असून, यंदा आधुनिक पद्धतीनेच शेती करण्याचा संकल्प शेतकऱ्यांनी केला आहे. बीबीएफ पेरणी प्रात्यक्षिक पाहण्यासाठी होती गर्दी पाण्याचा योग्य निचरा आणि मूलस्थानी जलसंधारणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या रुंद वरंबा-सरी म्हणजेच 'बीबीएफ' पेरणी पद्धतीचे महत्त्व उपकृषी अधिकारी एल. व्ही. फडणीस यांनी पटवून दिले. केवळ तोंडी मार्गदर्शन न करता, प्रशिक्षित सहाय्यक कृषी अधिकारी विलीन साखरे यांनी शेतात थेट बीबीएफ यंत्राद्वारे पेरणीचे प्रात्यक्षिक करून दाखवले. यामुळे उपस्थित शेतकऱ्यांना या आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी करावी, याचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले.

# मोटरसायकल मद्यधुंद अवस्थेत चालवली: गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिंधी)- पोलीस ठाणे अंतर्गत चंद्रकांत वय ३७ वर्षे, रा. मांगडगाव ता. केज जि. बीड हे दि.२९.०६.२०२६ रोजी आपल्या ताब्यातील मोटरसायकल क्र एमएच १४ बीडब्ल्यु १२४७ ही केज कळंब रोडवर मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SAYYED AAVEZ SAYYED AKHLAQUE**
TO: **SAYYED AAVEZ AKHLAQUE**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **SAYYED AAVEZ AKHLAQUE** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **SAYYED AAVEZ SAYYED AKHLAQUE**
NEW NAME:- **SAYYED AAVEZ AKHLAQUE**
Address - Inamadar Galli Rafique Chowk Naldurg Taluka Tuljapur DIST.Dharashiv -413602
Aadhar No. 895958316187
Mob.No8421713515

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **JAGIRDAR SAYYED FARHEEN S AKHLAKH**
TO: **FARHIN AKHLAKH SAYYED**
Hence for this Declaration i will be known by this name and will use SAYYED FARHIN AKHLAKH in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **JAGIRDAR SAYYED FARHEEN S AKHLAKH**
NEW NAME :- **FARHIN AKHLAKH SAYYED**
Address - Inamadar Galli Naldurg Taluka Tuljapur DIST. Dharashiv. -413602
Aadhar No. 996793087906
Mob.No. 8421713515

## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SHAIKH UMME KAUSAR MAHEBOOB SAB**
TO: **UMEKAUSAR SIRAJ SHAIKH**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **UMEKAUSAR SIRAJ SHAIKH** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **SHAIKH UMME KAUSAR MAHEBOOB SAB**
NEW NAME :- **UMEKAUSAR SIRAJ SHAIKH**
Address - At Post Kumbhari Taluka South Solapur DIST. Sokapur -413006
Aadhar No. 669597725116
Mob.No. 9975995423


# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649